**परिपत्रक क्र. १/२००८**

क्र. उसं/उ धो/२०/अप्रउ/२००८/बी-१०४४
उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मुंबई-४० ००३२
**दुरध्वनी:- ०२२-२२०२ ३५०५**
**फॅक्स:- ०२२-२२०२ ६८२६**
**ई-मेल :-dissip@maharashtra.gov.in**
दिनांक:- **०७.०१.२००८**

प्रति,
महा व्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र,
(सर्व)

विषय:- अखंडित प्रक्रिया उद्योग प्रमाणपत्र निर्गमित करणेबाबत
संदर्भ:- (१) शासन निर्णय क्र.एसएसआय२००७/(१२६६)/उद्योग -७, दिनांक ०४.०४.२००७
(२) मा. विकास आयूक्त (उ.द्योग) यांचे दिनांक ०४.१०.०७ चे पत्र
(३) मुख्य कायालयाचे परिपत्रक क्रलउधो/२०/अप्रउ/प्रमाणपत्र/बी-३९६६, दिनांक ०९.०४.२००७

## -: प रि प त्र क :-

उपरोक्त शासन निर्णय दिनांक ०४.०४.२००७ अन्वये महा व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांना सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना (यंत्रसामुग्री गुंतवणूक रु.१० कोटीपर्यंत) अखंडित/खंडित प्रक्रिया उद्योग असे प्रमाणपत्र देण्याबाबत सक्षम अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात आले आहे.

उद्योग संचालनालयाने अखंडित प्रक्रिया उद्योग प्रमाणपत्र देण्यासाठी मार्गदर्शक तत्वे वरील संदर्भिय पत्र क्र.३ अन्वये निर्गमित केली आहेत. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांव्यतिरिक्त ज्या उपक्रमांना अखंडित/खंडित प्रक्रिया उद्योग प्रमाणपत्र हवे असल्यास अशी प्रकरणे मुख्यालयास पाठविण्यात यावीत अशा सूचना याआधीच देण्यात आल्या आहेत.

महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना अखंडित प्रक्रिया उद्योग प्रमाणपत्र देताना १ ऑक्टोबर २००६ ते३०.०४.२००७ च्या कालावधीसाठी (व प्रशुल्क (Tariff) यासाठीच देण्यात यावे). महाराष्ट्र विद्युत नियमक आयोग यांच्या आदेशानुसार विजपुरवठा करणा-या कंपन्यांना टेरीफ आकारण्यासाठीच देण्यात यावे.

मा. विकास आयुक्त (उद्योग) यांचे असे निदर्शनास आले आहे की महा व्यवस्थापकांनी त्यांचे स्तरावर अखंडित प्रक्रिया उद्योग प्रमाणपत्र देताना मुख्यालयाचे मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी काटेकोरपणे केलेली दिसून येत नाही. प्रमाणपत्र देताना कालावधी व प्रशुल्क (Tariff) याचा उल्लेख

केलेला नाही. अखंडित प्रक्रिया उद्योग प्रमाणपत्र आवश्यक आहे त्या उद्योगांची यादी मार्गदर्शक तत्वांसोबत पाठविलेली आहे. तथापि या यादीतील उद्योगांव्यतिरिक्त इतर उद्योंगांनासुध्दा प्रमाणपत्र दिल्याचे दिसून आले आहे.

मा. विकास आयुक्त (उद्योग) यांनी सूचना दिल्या आहेत की यापूर्वी ज्या उद्योगांना कालावधी व प्रशुल्क(Tariff) यांचा उल्लेख न करता प्रमाणपत्र दिलेली आहेत अशी प्रमाणपत्रे रदद करून सुधारीत प्रमाणपत्र निर्गमित करण्यात यावीत व मार्गदर्शक तत्वांमधील ज्या उद्योगांची यादी जोडलेली आहे त्या उद्योगांव्यतिरिक्त ज्या उद्योगांना अखंडित प्रक्रिया उद्योग प्रमाणपत्र दिले आहे त्यांचे प्रमाणपत्र रदद करण्यात यावे.

वरील सूचनांप्रमाणे परिपत्रक मिळाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत कार्यवाही करावी. विहित कालावधीत कार्यवाही न केल्यास संबंधित महा व्यवस्थापकांची वैयक्तिक जबाबदारी राहील व त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सहपत्रः- मुख्यालयाने दिलेल्या प्रमाणपत्राचा नमुना माहितीसाठी सोबत जोडला आहे.**

**<u>विकास आयुक्त (उद्योग) यांचे मान्यतेने</u>**

आपला विश्वासू,

सही/-

उद्योग उप संचालक (ऊधो)